क्र.२/नसवि/महासभा/ ०१ /२०२०-२०२१
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०८ जुलै २०२०

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
महानगरपालिका सभा क्रमांक - ०१ /२०२०-२०२१
महानगरपालिका सभेची नोटीस (ऑनलाईन ॲपद्वारे)

प्रति,
मा. ----------

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मधील तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक १६/०७/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली येथे मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲपद्वारे आयोजित केली आहे.** या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी आपण सदर सभेस ऑनलाईन सहभागी व्हावे ही विनंती.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.११/०३/२०२० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.
२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
   अ) दु:खवट्याचे ठराव. ब) अभिनंदनाचे ठराव.
३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.
४. महापालिका आरोग्य विभाग,मिरज कडील सफाई कर्मचारी श्री.पंकज भुपाल होळकर यांना रक्ताचा कर्करोग या आजारावरील औषधोपचारासाठी आलेल्या र.रु.४,६९,६०८/- मात्र खर्चाच्या ९०% प्रमाणे र.रु.४,२२,६४७/- मात्रची वैद्यकीय प्रतिपूर्ती अदा करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१२/०३/२०२० रोजीचे विषयपत्र.**
५. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील नविन नियुक्त केलेल्या मानधन वरील १६५ साफसफाई कर्मचारी व ११७ वाहन चालक यांना अकुशल कर्मचारी प्रमाणे किमान वेतन लागू करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२९/०५/२०२० चे विषयपत्र.**
६. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकडील विविध विभागाकडे कार्यरत असणाऱ्या बदली,रोजंदारी व मानधन कर्मचाऱ्यांना नविन अधिसुचनेनुसार वाढीव विशेष भत्ता देणेस तसेच, मानधन वरील नविन नियुक्त केलेल्या २१६ कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.३०/०६/२०२० चे विषयपत्र.**
७. महानगरपालिका क्षेत्रातील जुना रेल्वे स्टेशन येथील एस.एफ.सी.मेगा मॉलच्या पिछाडीस मनपा मार्फत १८४ गाळे बांधण्यात आलेल्या मार्केटला श्री.साई मार्केट असे नामकरण करणेस स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धीकरण करुन सूचना / हकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०१/०७/२०२० चे विषयपत्र.**
८. महानगरपालिका क्षेत्रातील दैनिक परवाना फी वसुली करीता श्री.दिलीप रामचंद्र जाधव यांना ठेका देणेत आलेला आहे. त्यांनी दि.०४/०२/२०२० रोजीचे पत्राने महापुराच्या कालावधीमधील एक महिन्यामध्ये होणारी रक्कम भरणेसाठी सवलत मिळणेस मागणी केलेनुसार दैनिक परवाना फी वसुलीमध्ये सुट देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२६/०२/२०२० चे विषयपत्र.**
९. महानगरपालिका क्षेत्रातील दक्षिण शिवाजी नगर स.नं.१२४०४ मधील खुली जागा व बांधीव इमारत विकसीत करणेसाठी महानगरपालिका संयुक्त विद्यमानाने अध्यक्ष,अजिंक्यीयन फौंडेशन,सांगली यांनी दि.२४/०९/२०१८ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेनुसार २९ वर्षे मुदतीने भाड्याने देणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१६/११/२०१८ चे विषयपत्र.**
१०. महानगरपालिका आमराई उद्यानातील जळालेू लाकडाचा जिहिर लिलाव करणेस व लिलाव प्रक्रिया मा.आयुक्तासो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.२०/०३/२०२० चे विषयपत्र.**
११. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत संजयनगर,साठेनगर, पत्राचाळ सांगली येथे घरकुल योजनेमध्ये लाभार्थ्यांना ५५ लाभार्थ्यांना घरकुल वाटप करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (शहरविकास) यांचे दि.०५/०३/२०२० चे विषयपत्र.**

-- २ --

१२. दिव्यांग सक्षमीकरण अभियानांतर्गत महापालिका क्षेत्रातील दिव्यांगाना ५% दिव्यांग कल्याण निधीतून सन २०२०-२१ सालामध्ये दरमहा रु.६००/- उदरनिर्वाह भत्ता व दिव्यांग विद्यार्थ्यांना दरमहा रु.५००/- शिक्षण शिष्यवृत्ती देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी **उपायुक्त (दिव्यांग कक्ष) यांचे दि.२९/०६/२०२० चे विषयपत्र.**

१३. सन २०१९-२० सालामधील ५% दिव्यांग कल्याण निधीमध्ये शिल्लक र.रु.२,५०,१९,५२७/- मात्र व सन २०२०-२१ मधील अंदाजपत्रकीय तरतुद र.रु.२,४३,००,०००/- मात्र अशी एकूण र.रु.४,९३,१९,५२७/- मात्र अंदाजपत्रकीय तरतुद वाढविणेबाबत आलेले **उपायुक्त (दिव्यांग कक्ष) यांचे दि.२९/०६/२०२० चे विषयपत्र.**

१४. मिरज रि.स.नं.८३४/३ब/१ क्षेत्र ०.२१ हे.आर.या जागेवरील आरक्षणाने बाधीत होणाऱ्या जमिनीस महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ कलम १९ प्रमाणे खरेदी सूचना नोटीसनुसार अर्जदार श्री.अमुकसिद्ध श्रीकांत मजगे यांना सन २०१९ चे सिद्ध दर गणकानुसार सदर जमिनीचा दर र.रु.१७५०/- प्र.चौ.मी. प्रमाणे रु.३३,७७,५००/- मात्र नुकसान भरपाई देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना,मिरज) यांचे दि.०७/१२/२०१९ चे विषयपत्र.**

१५. सांगली शहर येथील स.नं.२६०/२ (सि.स.नं.६४१०/१८,१९) या जागेवरील आरक्षण क्र.१०४ व्हेज मार्केट व जनता मार्केट या आरक्षण प्रस्तावाचे खरेदी सूचना नोटीसनुसार अर्जदार श्री.विकास श्रीपाद कुलकर्णी यांचे वतीने ॲड.श्री.सचिन हांडीफोड यांनी बजावलेली सूचनानुसार अर्जदाराचे भूखंडाचे क्षेत्र ११४५.५० चौ.मी. इतके असून, सन २०१९-२० वार्षिक बाजार मूल्यनुसार दर रु.४१००/- प्रमाणे खुल्या जागेचे मुल्य रु.४८,११,१००/- व त्यावर तितकीच दिलासा रक्कम तसेच, १२% अतिरिक्त घटक दोन वर्षासाठी व ३% आस्थापना खर्च इ. प्रमाणे अंदाजित र.रु.१,११,००,०००/- मात्र नुकसान भरपाई देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना,मिरज) यांचे दि.२७/११/२०१९ चे विषयपत्र.**

१६. सांगली येथील सि.स.नं.१अ/६ क्षेत्र २५७.७० चौ.मी. व सि.स.नं.१अ/१३ क्षेत्र २५७.७० चौ.मी. या भूखंडावरील आरक्षण क्र.२१९ गार्डन या आरक्षण प्रस्तावाचे कलम ४९ प्रमाणे खरेदी सुचना नोटीस नुसार अर्जदार सौ.नविना राजेंद्र पाटील यांचे वतीने ॲड.श्री.सचिन हांडीफोड यांनी बजावलेली खरेदी सूचनानुसार विषयांकीत जागेचे भूखंडाचे एकूण क्षेत्र ५१५.४० चौ.मी असून, सन २०१९-२० नुसार जागेचा प्रति चौ.मी. दर रु.१०८९०/- असून, त्यानुसार खुल्या जागेचे मुल्य रु.५६,१२,७०६/- त्यावर तितकीच दिलासा रक्कम तसेच,१२% अतिरिक्त घटक दोन वर्षासाठी व ३% आस्थापना खर्च इ. प्रमाणे अंदाजित र.रु.१,२९,५०,०००/- मात्र नुकसान भरपाई देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना,सांगली) यांचे दि.२७/११/२०१९ चे विषयपत्र.**

१७. सांगली येथील सि.स.नं.२३२३,२३२४ व आणि २३२७ या जागेवरील ६मी. रुंदीचा विकास योजना रस्ता कामी कलम ४९ प्रमाणे खरेदी सूचना नोटीसनुसार अर्जदार श्री.सुहास गोविंद पेंडसे यांनी बजावलेली खरेदी सूचनानुसार विषयांकीत जागेचे भूखंडाचे एकूण क्षेत्र ८९.२१ चौ.मी असून, सन २०१९-२० नुसार जागेचा प्रति चौ.मी. दर रु.७१३०/- असून, त्यानुसार खुल्या जागेचे मुल्य रु.६,३६,०६७/- त्यावर तितकीच दिलासा रक्कम तसेच,१२% अतिरिक्त घटक दोन वर्षासाठी इ. प्रमाणे अंदाजित र.रु.१३,४८,४६२/- मात्र नुकसान भरपाई देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना,सांगली) यांचे दि.२०/०२/२०२० चे विषयपत्र.**

१८. सांगली खणभाग सि.स.नं.१७२३ मधील जागेमधून विकास योजना प्रस्तावित ६.१० मी.रस्तारुंदीने बाधीत क्षेत्र संपादन करुन घेणेकामी सदरची मिळकत खाजगी मालकीची असून, रस्ता रुंदीकरणास मुळ मालकची संमती नाही. त्यामुळे सदर जागेचा भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे तसेच, रस्ता रुंदीकरणाने बाधीत क्षेत्र १२८.१० चौ.मी. असून, खुल्या जागेचा दर बाजार मुल्य दरानुसार रु.१५४६०/- इतका आहे. त्यानुसार होणारे मुल्यांकन रु.१९,८०,४२६/- + १००% दिलासा रक्कम + २४% अतिरिक्त घटक दोन वर्षासाठी नुसार अंदाजे र.रु.४४,३६,१५४/- मात्र नुकसान भरपाई देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना,सांगली) यांचे दि.०८/०२/२०२० चे विषयपत्र.**

१९. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९६ मधील तरतुदीनुसार स्थायी समितीने शिफारसीत केलेल्या महानगरपालिकेच्या सन २०१९-२० चे दुरुस्त व सन २०२०-२१ या वर्षाच्या अर्थसंकल्पास उक्त अधिनियमाच्या कलम १०० अन्वये अंतिम स्वीकृती देणे.

२०. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

२१. मा.महापौर, यांचे संमतीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

(टिप - मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन ॲपद्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रियेसंदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेजर यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.)

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ०२

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.११/०३/२०२० रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. १८३ ते २२१ सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदर कार्यवृत्तातील ठराव क्र.२१७ मध्ये कुपवाड वॉर्ड क्र. ८ मधील गंगानगर, अष्टविनायक नगर, मंगलमूर्ती कॉलनी, विकास कॉलनी या भागामध्ये मनपाच्या मंजूर विकास योजनेनुसार डी.पी. रस्ते मंजूर असून तेथील नागरिकांनी मनपाकडे गुंठेवारी नियमितीकरणासाठी प्रस्ताव सादर केले आहे. सदर भाग गुंठेवारीचा असून सदर भागात गेल्या २० वर्षापासून घरे आहेत. सदर भागातील सर्व्हे नं.१०४, १०५, २२२ व १०६ मधील सर्व डी.पी. रस्ते कलम ३७ अन्वये फेर बदल करणेसाठी प्रशासनाने परिसरातील सर्व रस्त्यांची पाहणी करुन प्रस्ताव सादर करणेस ही सभा आदेशीत करीत आहे. अशी दुरुस्ती ठराव क्र.२१७ मध्ये करुन सदरचे कार्यवृत्त ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- मा. विष्णू माने. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. संदिप आवटी. सहायक.

१) स.स.न.र

२) [illegible]

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ७

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१२/०३/२०२० रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका आरोग्य विभाग,मिरज कडील सफाई कर्मचारी श्री.पंकज भुपाल होळकर यांना रक्ताचा कर्करोग या आजारावरील औषधोपचारासाठी झालेल्या र.रु.४,६९,६०८/- मात्र खर्चाच्या ९०% प्रमाणे र.रु.४,२२,६४७/- मात्रची वैदयकीय प्रतिपूर्ती अदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

तसेच, सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार महापालिका कर्मचारी यांना वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेसाठी शासन नियमानुसार तात्काळ समिती गठीत करणेस तसेच, महापालिकेमध्ये कार्यरत असलेल्या कायम, मानधन, बदली, रोजंदारी या सर्व कर्मचाऱ्यांचा कोविड-१९ च्या धर्तीवर वैद्यकिय विमा उतरविण्याची कार्यवाही प्रशासनाने ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- N G Nair मा. नसिमा नाईक. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.संदिप आवटी. महापौर,

प्रशासन प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ०८

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२९/०५/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील नविन नियुक्त केलेल्या मानधन वरील १६५ साफसफाई कर्मचारी व ११७ वाहन चालक यांना अकुशल कर्मचारी प्रमाणे किमान वेतन लागू करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

सूचक :- Y. S Bawadekar
मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

महापौर,

प्रशा. अधि. (आरोग्य) / वै. आ. अ

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ०९

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.३०/०६/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकडील विविध विभागाकडे कार्यरत असणाऱ्या जुन्या बदली,रोजंदारी व मानधन कर्मचाऱ्यांना जुन्या अधिसूचनेनुसार सद्या विशेष भत्ता र.रु.२२४०/- दिला जातो. त्यामध्ये नविन अधिसुचनेनुसार झालेल्या वाढीनुसार विशेष भत्ता र.रु.३०१०/- वाढीव याप्रमाणे एकूण र.रु.५२५०/- विशेष भत्ता देणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, मानधन वरील नविन नियुक्त केलेल्या स्थापत्य अभियंता १०, पाणी पुरवठा मुजर / व्हॉल्वमन २५, रिक्षाघंटा गाडी वाहन चालक व जड वाहनचालक १४०, जेसीबी चालक ०१, पाणी पुरवठा मजूर ४० या एकूण २१६ कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, यापुढे मा.शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे वेळोवेळी प्रसिद्ध होणाऱ्या अधिसूचना मध्ये सुधारीत होणारे विशेष भत्त्यानुसार मानधन,रोजंदारी व बदली कर्मचाऱ्यांना वेतन आदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.संजय नायकू मेंढे यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील आरसीएच विभागातील मानधनावरील कर्मचारी यांना पगार वाढ देणेच्या सूचनेच्या अनुषंगाने ही सभा असे निर्देश देते की, आरसीएच कडील सर्व कर्मचाऱ्यांना दरवर्षी ८% प्रमाणे वाढ दिली जाते. त्यामध्ये यापुढे मा.शासनाकडून वेळोवेळी सुधारीत होणाऱ्या भत्त्यानुसार पगार वाढ करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. युवराज गावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ९०

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०१/०७/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील जुना रेल्वे स्टेशन येथील एस.एफ.सी.मेगा मॉलच्या पिछाडीस मनपा मार्फत १८४ गाळे बांधण्यात आलेल्या मार्केटला श्री.साई मार्केट असे नामकरण करणेस स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धीकरण करुन सूचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली सर्व्हे नं.१०८६ या महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेवर सांगली जिल्ह्याचे सुपूत्र तत्कालीन मंत्री लोकनेते स्व.राजारामबापू पाटील यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे व परिसर विकसीत करणेकामी अंदाजपत्रक व आराखडे तयार करणेसाठी महापालिका पॅनेलवरील वास्तुविशारद प्रमोद चौगुले यांची नियुक्ती करणेस तसेच, पुतळा बसविणेकामी मा.शासनाकडून मान्यता आणणे, आवश्यक त्या सर्व परवानग्या घेणे,पुतळा बसविणे व परिसर विकासीत करणेकामी येणाऱ्या अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- N.G.Nair. मा. नसिमा नाईक ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. संदिप आवटी महापौर,

१) मालमत्ता व्यवस्थापक
२) शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ११

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२६/०२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील दैनिक परवाना फी वसुली करीता श्री.दिलीप रामचंद्र जाधव यांना ठेका देणेत आलेला आहे. त्यांनी दि.०४/०२/२०२० रोजीचे पत्राने महापुराच्या कालावधीमधील एक महिन्यामध्ये होणारी रक्कम भरणेसाठी सवलत मिळणेस मागणी केलेनुसार दैनिक परवाना फी वसुलीमध्ये सुट देणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

दैनिक परवाना वसुलीकरीता नियुक्त केलेल्या ठेकेदार यांनी मागणी केलेली महापुराच्या कालावधीतील सवलत /सुट ही सभा नामंजुर करीत असून, श्री.जाधव यांनी गेल्या सहा महिन्यापासून वसुलात आणलेली दैनिक परवाना वसुली रक्कम महापालिकेकडे जमा न् केल्यामुळे त्यांचा ठेका ही सभा रद्द करीत आहे. तसेच, त्यांची महापालिकेकडे जमा असलेली अनामत रक्कम जप्त करुन, त्यांचेकडून प्रशासनाने चालू महिनाअखेर सर्व थकीत रक्कम वसुल करावी असे ही सभा आदेशित करीत आहे. सदरकामी नविन ठेकेदार नियुक्त करणेसाठी निविदा प्रक्रिया राबविणेस ही सभा मान्यता देत असून, सदरची निविदा प्रक्रिया १५ दिवसात पूर्ण करावी व दरम्यानच्या कालावधीसाठी प्रशासनाने महापालिका कर्मचाऱ्यांमार्फत दैनंदिन परवाना वसुली करावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

तसेच, सांगली प्रमाणे मिरज व कुपवाड विभागासाठी नविन ठेकेदार नियुक्त करणेसाठी निविदा प्रक्रिया राबविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- N.G.Naik मा. नसिमा नाईक ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. संदिप आवटी. महापौर,

सहायक आयुक्त

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

कार्यालय अधिक्षक

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ९४

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (शनादानिक) यांचे दि.०५/०३/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत संजयनगर,साठेनगर, पत्राचाळ सांगली येथे घरकुल योजनेमध्ये लाभार्थ्यांना ५५ लाभार्थ्यांना घरकुल वाटप करणेस मान्यता देणेकामी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत झोपडपट्टी धारकांचे पुर्नवसन करणे व त्यांना घरकुल वाटप करणेकामी महापालिकेने सर्वांसाठी घरे २०२२ अंतर्गत सनियंत्रण समिती गठीत केलेली आहे. सदरचा विषय सनियंत्रण समितीच्या शिफारशीने फेरसादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- N.G.Naik. मा. नसिमा नाईक. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. संदिप आवटी. महापौर,

नगरअभियंता (शनादानिक)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

	हिस्सा भरणेसाठी पत्र दिलेले लाभार्थी.		

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ७२

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१६/११/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील दक्षिण शिवाजी नगर स.नं.१२४०४ मधील खुली जागा व बांधीव इमारत विकसीत करणेसाठी महानगरपालिका संयुक्त विद्यमानाने अध्यक्ष,अजिंकीयन फौंडेशन,सांगली यांनी दि.२४/०९/२०१८ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेनुसार २९ वर्षे मुदतीने भाड्याने देणेकामीच्या प्रस्तावासोबत सदर संस्थेची कागदपत्रे, ऑडीट रिर्पोट नसलेमुळे तसेच, संस्थेस भाडे तत्वावर देणेच्या जागेचे भाडे निश्चित न् केलेमुळे सदरचा विषय ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज सि.स.नं.४९०० व सि.स.नं.४९२० ही महानगरपालिकेच्या मालकीची जागा अमन युथ असोसिएशन यांना महासभेने यापुर्वी निश्चित केलेले भाडे कराराने ९ वर्षे दिली होती. त्याची मुदत संपलेली आहे. सदर भाडेपट्टयातील करारानुसार दिलेल्या जागेत संस्थेच्या वतीने व्यायाम शाळा बांधून त्यामध्ये अद्यावत यंत्रे व्यायाम साहित्य उपलब्ध करुन, सामाजिक बांधीलकीने ते सर्वांसाठी खुली व मोफत ठेवण्यात आलेली आहे. गेली कित्येक वर्षे संस्था सभासदांना विनाशुल्क, मोफत सेवा देत आहे. यासाठी अमन युथ असोसिएशन यांना महासभेने यापुर्वी निश्चित केलेले भाडेने २९ वर्षे कराराने मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

तत्कालीन नगरपालिका असताना सन १९६१ चे म्युनसिपल ट्रस्ट प्रॉपर्टीचे नावे असलेल्या सि.स.नं.२५० मधील ५०X८० मापाची जागा चेतक व्यायाम मंडळ सांगली यांना प्रादेशिक संचालक न.पा.प्रशासन पुणे यांचे कडील क्र.नपा.आर.९९० दि.३०/१०/१९९१ रोजीच्या आदेशाने ३० वर्षे भाडे पट्टयाच्या कराराने दिलेली होती. सांगली नगरपरिषदेने २८/११/१९९१ चे कब्जेपट्टी प्रमाणे ३० वर्षे मुदतीचा भाडेपट्टा संस्थेस करुन दिला आहे.

सदर भाडेपट्टयातील करारानुसार दिलेल्या जागेत संस्थेच्या वतीने व्यायाम शाळा बांधून त्यामध्ये अद्यावत यंत्रे, व्यायाम साहित्य उपलब्ध करुन सामाजिक बांधीलकीने ती सर्वांसाठी खुली व मोफत ठेवण्यात आलेली आहेत. गेली २७-२८ वर्षे संस्था सभासदांना विनाशुल्क,मोफत सेवा देत आहे. यामुळे या भागातील सर्व सामान्य तरुणांना व्यायामाची आवड निर्माण होवून त्यापैकी अनेकजण पोलिस मिलिटरी व खाजगी सिक्युरिटी यासारख्या क्षेत्रात काम करीत आहे. त्यामुळे पुर्वीप्रमाणेच चेतक व्यायाम मंडळ या संस्थेस तत्कालीन नगरपालिकेच्या करारानुसार पुढील २९ वर्षे कराराने मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.प्रकाश शामराव मुळके यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.१० स.नं.२६४ A मध्ये असलेल्या महानगरपालिकेच्या शाळा नं.२६ मधील रिकाम्या खोलीमध्ये शालेय विद्यार्थी व परिसराजील युवक यांना शरीर सौष्ठव्य यांची आवड निर्माण होवून त्यांचे आरोग्य चांगले रहावे यादृष्टीने व्यायाम शाळा तयार करणेसाठी गणेशानंद कला क्रिडा व सांस्कृतिक मंडळ,सांगली यांना सहा.संचालक नगररचना यांचेकडून निश्चित करुन घेवून २९ वर्षे कराराने दर ३ वर्षानी २०% भाडेवाढ करण्याच्या अटीवर सदर शाळेमधील बंद अवस्थेत असलेली खोली भाड्याने देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- N.G.Naik मा. नसिमा नाईक ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- मा. संदिप आवटी. महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ९३

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.२०/०३/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका आमराई उद्यानातील जळावू लाकडाचा जाहिर लिलाव करणेस व लिलाव प्रक्रिया मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- N.G.Naik मा. नसिमा नाईक ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.संदिप आवटी. महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ९५

विषय क्रमांक :- १२

सोबतचे उपायुक्त (दिव्यांग कक्ष) यांचे दि.२९/०६/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

दिव्यांग सक्षमीकरण अभियानांतर्गत महापालिका क्षेत्रातील दिव्यांगाना ५% दिव्यांग कल्याण निधीतून सन २०२०-२१ सालामध्ये दरमहा रु.६००/- उदरनिर्वाह भत्ता व दिव्यांग विद्यार्थ्यांना दरमहा रु.५००/- शिक्षण शिष्यवृत्ती देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, ज्या दिव्यांगांची नोंदणी यापूर्वी झालेली नव्हती व ज्यांची कोविड-१९ च्या कालावधीत ऑनलाईन नोंदणी झालेली आहे अशा सर्व लाभार्थ्यांनांही उदरनिर्वाह भत्ता व शिक्षण शिष्यवृत्ती देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- N.Gavlie. मा. नसिमा नाईक ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. संदिप भाबडी

महापौर,

दिव्यांग कक्ष प्रमुख

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ९६

विषय क्रमांक :- १३

सोबतचे उपायुक्त (दिव्यांग कक्ष) यांचे दि.२९/०६/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सन २०१९-२० सालामधील ५% दिव्यांग कल्याण निधीमध्ये शिल्लक र.रु.२,५०,१९,५२७/- मात्र व सन २०२०-२१ मधील अंदाजपत्रकीय तरतुद र.रु.२,४३,००,०००/- मात्र अशी एकूण र.रु.४,९३,१९,५२७/- मात्र अंदाजपत्रकीय तरतुद वाढविणेस ही सभा मान्यता देत आहे.

प्रस्तुत कामी सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पात वाढीव तरतुद करणेची दक्षता लेखाविभाग यांनी घेणेची आहे.

सूचक :- N.G.Naik मा. नसिमा नाईक. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. संदिप आवटी. महापौर,

दिव्यांग कक्ष प्रमुख

महापालिका [illegible]

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

३.	दिव्यांग विदयार्थी शालेय शिक्षण शिष्यवृत्ती	१२९० दिव्यांग विदयार्थी * ५०० प्रतिमहा याप्रमाणे माहे रक्कम रु.६,४५,००० /- मात्र त्यानुसार एकूण	७७,४०,०००/-

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ९७

विषय क्रमांक :- १४

सोबतचे उपायुक्त (नगररचना,मिरज) यांचे दि.०७/१२/२०१९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज रि.स.नं.८३४/३ब/१ क्षेत्र ०.२१ हे.आर.या जागेवरील आरक्षणाने बाधीत होणाऱ्या जमिनीस महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ कलम १९ प्रमाणे खरेदी सूचना नोटीसनुसार अर्जदार श्री.अमुकसिद्ध श्रीकांत मजगे यांना सन २०१९ चे सिद्ध दर गणकानुसार सदर जमिनीचा दर र.रु.१७५०/- प्र.चौ.मी. प्रमाणे रु.३३,७७,५००/- मात्र नुकसान भरपाई देणेस मान्यता देणेकामी सभागृहात झाले चर्चेनुसार महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता सद्यस्थितीत महापालिकेस रोख नुकसान भरपाई देणे शक्य नसल्याने, उपरोक्त आरक्षित जागेवरील आरक्षण उठू नये यासाठी नविन भूसंपादन कायद्यानुसार अर्जदार यांना टी.डी.आर. देवून, भूसंपादन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उपरोक्त कामी योग्यती कार्यवाही प्रशासनाने सत्वर ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत असून, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही दिरंगाई झालेस, त्यास सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

सूचक :- N.G.Naik.

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- ७८

विषय क्रमांक :- १५

उपायुक्त (नगररचना,सांगली) यांचे दि.२७/११/२०१९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली शहर येथील स.नं.२६०/२ (सि.स.नं.६४१०/१८,१९) या जागेवरील आरक्षण क्र.१०४ व्हेज मार्केट व जनता मार्केट या आरक्षण प्रस्तावाचे खरेदी सूचना नोटीसनुसार अर्जदार श्री.विकास श्रीपाद कुलकर्णी यांचे वतीने ॲड.श्री.सचिन हांडीफोड यांनी बजावलेली सूचनानुसार अर्जदाराचे भुखंडाचे क्षेत्र ११४५.५० चौ.मी. इतके असून, सन २०१९-२० वार्षिक बाजार मुल्यनुसार दर रु.४१००/- प्रमाणे खुल्या जागेचे मुल्य रु.४८,११,१००/- व त्यावर तितकीच दिलासा रक्कम तसेच, १२% अतिरिक्त घटक दोन वर्षासाठी व ३% आस्थापना खर्च इ. प्रमाणे अंदाजित र.रु.१,११,००,०००/- मात्र नुकसान भरपाई देणेकामी सभागृहात झाले चर्चेनुसार महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता सद्यस्थितीत महापालिकेस रोख नुकसान भरपाई देणे शक्य नसल्याने, नविन भूसंपादन कायद्यानुसार अर्जदार यांना ए.आर.प्रमाणे भूसंपादन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उपरोक्त कामी योग्यती कार्यवाही प्रशासनाने सत्वर ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत असून, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही दिरंगाई झालेस, त्यास सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

सूचक :- N.G.Naik मा. नसिमा नाईक ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- Umila Belvalkar मा. उर्मिला बेळवलकर. महापौर,

स.स.न.र.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- १९

विषय क्रमांक :- १६

उपायुक्त (नगररचना,सांगली) यांचे दि.२७/११/२०१९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली येथील सि.स.नं.१अ/६ क्षेत्र २५७.७० चौ.मी. व सि.स.नं.१अ/१३ क्षेत्र २५७.७० चौ.मी. या भूखंडावरील आरक्षण क्र.२१९ गार्डन या आरक्षण प्रस्तावाचे कलम ४९ प्रमाणे खरेदी सुचना नोटीस नुसार अर्जदार सौ.नविना राजेंद्र पाटील यांचे वतीने ॲड.श्री.सचिन हांडीफोड यांनी बजावलेली खरेदी सूचनानुसार विषयांकीत जागेचे भूखंडाचे एकूण क्षेत्र ५१५.४० चौ.मी असून, सन २०१९-२० नुसार जागेचा प्रति चौ.मी. दर रु.१०८९०/- असून, त्यानुसार खुल्या जागेचे मुल्य रु.५६,१२,७०६/- त्यावर तितकीच दिलासा रक्कम तसेच,१२% अतिरिक्त घटक दोन वर्षासाठी व ३% आस्थापना खर्च इ. प्रमाणे अंदाजित र.रु.१,२९,५०,०००/- मात्र नुकसान भरपाई देणेकामी सभागृहात झाले चर्चेनुसार महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता सद्यस्थितीत महापालिकेस रोख नुकसान भरपाई देणे शक्य नसल्याने, नविन भूसंपादन कायद्यानुसार अर्जदार यांना ए.आर. प्रमाणे भूसंपादन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उपरोक्त कामी योग्यती कार्यवाही प्रशासनाने सत्वर ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत असून, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही दिरंगाई झालेस, त्यास सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

सूचक :- N.G.Naik मा. नसिमा नाईक. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- Umila Belvalkar मा. उर्मिला बेलवलकर. महापौर,

स.स.नं.र.

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :-२०

विषय क्रमांक :- १७

सोबतचे उपायुक्त (नगररचना,सांगली) यांचे दि.२०/०२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली येथील सि.स.नं.२३२३,२३२४ ब आणि २३२७ या जागेवरील ६मी. रुंदीचा विकास योजना रस्ता कामी कलम ४९ प्रमाणे खरेदी सूचना नोटीसनुसार अर्जदार श्री.सुहास गोविंद पेंडसे यांनी बजावलेली खरेदी सूचनानुसार विषयांकीत जागेचे भूखंडाचे एकूण क्षेत्र ८९.२१ चौ.मी असून, सन २०१९-२० नुसार जागेचा प्रति चौ.मी. दर रु.७१३०/- असून, त्यानुसार खुल्या जागेचे मुल्य रु.६,३६,०६७/- त्यावर तितकीच दिलासा रक्कम तसेच,१२% अतिरिक्त घटक दोन वर्षासाठी इ. प्रमाणे अंदाजित र.रु.१३,४८,४६२/- मात्र नुकसान भरपाई देणेकामी सभागृहात झाले चर्चेनुसार व समक्षात जागेवर पहाणी केली असता, सदर रस्त्यास पर्यायी रस्ते उपलब्ध असून, सदर जागा ताब्यात घेणे या सभेस उचित वाटत नसल्याने, भूसंपादन करणेची आवश्यकता नाही. त्यामुळे सदरचा प्रस्ताव ही सभा नामंजूर करीत आहे.

सूचक :- (संजय यमगर) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ. उर्मिला उदय बेलवलकर महापौर,

स.स.न.र.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- २१

विषय क्रमांक :- १८

सोबतचे उपायुक्त (नगररचना,सांगली) यांचे दि.०८/०१/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली खणभाग सि.स.नं.१७२३ मधील जागेमधून विकास योजना प्रस्तावित ६.१० मी.रस्तारुंदीने बाधीत क्षेत्र संपादन करुन घेणेकामी सदरची मिळकत खाजगी मालकीची असून, रस्ता रुंदीकरणास मुळ मालकाची संमत्ती नाही. त्यामुळे सदर जागेचा भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे तसेच, रस्ता रुंदीकरणाने बाधीत क्षेत्र १२८.१० चौ.मी. असून, खुल्या जागेचा दर बाजार मुल्य दरानुसार रु.१५४६०/- इतका आहे. त्यानुसार होणारे मुल्यांकन रु.१९,८०,४२६/- + १००% दिलासा रक्कम + २४% अतिरिक्त घटक दोन वर्षासाठी नुसार अंदाजे र.रु.४४,३६,१५४/- मात्र नुकसान भरपाई देणेस मान्यता देणेकामी सभागृहात झाले चर्चेनुसार महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता सद्यस्थितीत महापालिकेस रोख नुकसान भरपाई देणे शक्य नसल्याने, उपरोक्त आरक्षित जागेवरील आरक्षण उठू नये यासाठी नविन भूसंपादन कायद्यानुसार अर्जदार यांना टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. देवून, भूसंपादन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उपरोक्त कामी योग्यती कार्यवाही प्रशासनाने सत्वर ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत असून, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही दिरंगाई झालेस, त्यास सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

सूचक :- N.G.Nair मा. नसीमा नाईक ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- Unmilbewoor मा. उर्मिला बेलवलकर

महापौर,

स.स.न.१

महापालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

विषयास बाजूला रस्ता बाधितापैकी बाधित जागा धरुन सोडतीचा परस्पर जागरचय झाले.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- २२

विषय क्रमांक :- १९

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९६ मधील तरतुदीनुसार स्थायी समितीने शिफारसीत केलेले अंदाजपत्रक व त्यामधील तरतुदी या सभेने अवलोकनी घेतल्या.

मा.स्थायी समिती अंदाज

तपशील	सन २०१९-२०२० चे सुधारीत अंदाजपत्रक		सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रक	
आरंभीची शिल्लक		४५७०९४३६९		**१७८८४८५०८५**
जमा बाजू				
महसुली जमा	२४७०००६५४७			२८४३५५६९००
डेडहेडस जमा	५९४५९६१८९			६७१२४४८००
शासन सु.शिल्लक ब	०	२३३८०९५९६९		०
भांडवली जमा -ब	१९५७२०००००			१८४५७०००००
एकूण जमा	**५०२१८०२७३६**		**५३६०५०१७००**	
जनरल / शासन फंड शिल्लकेसह जमा		**७८१६९९३०७४**		**७१४८९८६७८५**
महसुली खर्च	२२३०७२४८००			२७५८६७५१०६
भांडवली खर्च-अ	६९२६३७०००			१४५३४५१०००
डेडहेडस खर्च	५९४५९६१८९			६७१२४४८००
भांडवली खर्च-ब	२५१०५५००००			२२५७७५००००
एकूण खर्च	**६०२८५०७९८९**		**७१४११२०९०६**	
जनरल फंड/ शासन संभाव्य शिल्लक		**१७८८४८५०८५**		**७८६५८७९**

अंदाजपत्रकामध्ये नमुद केलेल्या वैशिष्ठपूर्ण बाबी या सभेस भूषणावह आहेत. महापालिका क्षेत्रातील नागरिकांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. केंद्र शासन व राज्य शासनाकडून शहरामध्ये सोई-सुविधासाठी अनुदान मिळते. त्याचा पुरेपूर लाभ घेवून, शहराचा विकास साधणे आवश्यक आहे. गतवर्षी आलेला महापूर व चालू वर्षी आलेली कोविड-१९ ची आपत्ती यामुळे महापालिकेची महसुली जमा मध्ये मोठ्या प्रमाणात तुट झालेली आहे. त्यामुळे प्रशासनाने केंद्र व राज्य शासनाकडून जास्तीत जास्त अनुदान प्राप्त होणेसाठी लक्ष केंद्रीत करुन अनुदान मिळणेसाठी पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

२०२०-२०२१ मा.महासभा यांनी सुचविलेले बदल

(सर्व आकडे कोटीत)

अ.क्र.	लेखाशिर्षाचे नांव	2020-2021	
		कमी	वाढ
	खर्च बाजू		
E-1094	सांगली सिव्हिल हॉस्प.मागे सि.स.नं.12778/83 मनपा ओपनस्पेस मध्ये जीमसह सभागृह बांधणे	0.00	0.77
E-1095	सांगली सि.स.नं.12867 मनपा ओपनस्पेस मध्ये सभागृह बांधणे	0.00	0.40
E-1000	माळबंगला 56mld पंप हाऊस मॅनिफोल्डसह दुरुस्ती करणे	0.00	0.25
E-1001	माळबंगला केंद्र येथील जुन्या उंच टाकीडोम स्लॅबची दुरुस्ती करणे	0.00	0.20
E-1002	वॉ.क्र.8 क मध्ये नवीन पिण्याची टाकी बांधणे	0.00	0.50
E-0063	कोविड-19 -मयत कर्मचारी सानुग्रह सहाय र.रु.10 लाख (कायम, मानधन, रोजंदारी व बदली)	0.00	1.00
E-1018	सांगली शहरातील नाले शुध्दीकरण व सां.वाडी/ सांगली उत्तर भागासाठी मलःनिस्सारण केंद्र ट्रक टर्मिनल्स वखारभाग सांगली येथे उभा करणे	0.00	1.00
E-0481	प्रतापसिंह उद्यान सांगली येथे 9 डि थिएटर विकसीत करणे	0.00	0.50
E-0118	मा महापौर अतिथी भत्ता	0.00	0.0050
E-0121	मा.उपमहापौर अतिथी भत्ता	0.00	0.0025
E-0122	सभागृह पक्ष नेता पार्टी मिटिंग चहापान खर्च	0.00	0.0025
E-0123	विरोधी पक्ष नेता पार्टी मिटिंग चहापान खर्च	0.00	0.0025
E-0124	सभागृह तथा गट नेता अतिथी भत्ता	0.00	0.0025
E-0128	गट नेता राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी चहापान खर्च	0.00	0.0025
E-0258	वाहन देखभाल दुरुस्ती	0.00	0.10
E-0268	पर्यावरण अहवाल तयार करणे	0.00	0.05
E-0269	नैसर्गिक आपत्ती व मदत कार्य	0.00	10.00
E-0271	डास प्रतिबंधक द्रव्ये	0.00	0.50
E-0272	फॉगिंगमशीन पेट्रोल	0.00	0.30
E-0276	जंतूनाशक द्रव्ये	0.00	0.25
E-0277	माशा प्रतिबंधक द्रव्य	0.00	0.25
E-0282	घनकचरा व्यवस्थापन	5.00	0.00
E-289	सार्व.शौचालय देखभाल दुरूस्ती	0.00	0.10
E-0290	करोना रक्षक कर्मचारी विमा	0.00	0.25

E-0348	मुलेअ वाहन देखभाल दुरुस्ती	0.00	0.0030
E-0446	साथी निवारण व्यवस्था	0.00	0.48
E-0460	उद्यानासाठी खेळणी खरेदी करणे	0.00	0.05
E-0463	आकस्मीक	0.00	0.07
E-0522	मा. महापौर निधी	0.70	0.00
E-0523	मा. उपमहापौर निधी	0.75	0.00
E-0524	मा. सभापती स्था. समिती निधी	0.75	0.00
E-0537	मा.सभागृह तथा गट नेता निधी	0.75	0.00
E-0541	मा.विरोधी गट नेता निधी	0.75	0.00
E-0542	मा.राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी गट नेता	0.75	0.00
E-0544	प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र सक्षमीकरण व उपाययोजना	0.00	4.00
E-0633	मक्तेदार पध्दतीने मजूर पुरवठा	0.00	0.35
E-0638	हत्यारे,यंत्रसामुग्रीसाठी स्पेअर पार्टस देखभाल दुरूस्ती	0.00	0.15
E-0644	पाईप लाईन देखभाल दुरुस्ती,मिरज	0.00	0.10
E-0648	क्लोरोनेशन / केमिकल्स	0.00	0.15
E0654	बोअर दुरुस्ती सांगली	0.00	0.03
E-0659	फिल्टर हाऊस देखभाल दुरुस्ती,मिरज	0.00	0.10
E-0665	मिरज 10 एम एल डि जलशुध्दकरण केंद्र चालविणे / देखभाल	0.00	0.11
E-0671	हिराबाग जलशुध्दीकरण केंद्र दुरुस्ती करणे	0.00	0.05
E-0673	बोअर दुरुस्ती, मिरज	0.00	0.06
E-0697	अपात्र खर्चासाठी द्यावयाची रक्कम	0.00	0.01
E-701	मनपा शाळेसाठी प्रोत्साहनपर अनुदान	0.00	0.50
E-0840	जंतुनाशके व स्वच्छता साहित्य दुरूस्ती	0.00	0.05
E-0841	डांस व माशा प्रतिबंधक औषधे खरेदी	0.00	0.01
E-0846	पावसाळी पाण्याचा निचरा करणे (मनपा व शासन जागेवरील)	0.00	0.45
E-0876	जंतुनाशके व स्वच्छता साहित्य दुरूस्ती	0.00	0.05
E-0877	डांस व माशा प्रतिबंधक औषधे खरेदी	0.00	0.02
E-0882	पावसाळी पाण्याचा निचरा करणे (मनपा व शासन जागेवरील)	0.00	0.40
E-0911	जंतुनाशके व स्वच्छता साहित्य दुरूस्ती	0.00	0.02

E-0912	डांस व माशा प्रतिबंधक औषधे खरेदी	0.00	0.02
E-0916	पावसाळी पाण्याचा निचरा करणे (मनपा व शासन जागेवरील)	0.00	0.40
E-0946	जंतुनाशके व स्वच्छता साहित्य दुरूस्ती	0.00	0.02
E-0947	डांस व माशा प्रतिबंधक औषधे खरेदी	0.00	0.02
E-0952	पावसाळी पाण्याचा निचरा करणे (मनपा व शासन जागेवरील)	0.00	0.40
E-0982	नवीन पाईपलाईन टाकणे व खरेदी तसेच पाणी पुरवठा सोयी उपलब्ध करणे , मिरज	0.00	0.15
E-0983	नवीन पाईपलाईन टाकणे व खरेदी , सांगली, कुपवाड, वानलेसवाडी	0.00	0.25
E-0984	सांगली शहर मूळ पाणी पुरवठा योजना सुधारणा करणे (दाबनलिका, वितरण व्यवस्था इं.)	0.00	0.40
E-0987	माळबंगला ते यशवंतनगर पंप हाऊस पर्यंतची जुनी ए सी रायझिंग मेन बदलणे	0.00	0.45
E-0992	कोथळेनगर श्रीकृष्णनगर बुधगांव रोड येथे पिण्याची पाईप लाईन टाकणे	0.00	0.20
E-993	सांगली मिरज मुख्य वितरण नलिकेवरील व्हॉल्व बदलणे	0.00	0.04
E-0988	मनपा क्षेत्रात ठिकठिकाणी 50 नवीन बोअर मारणे	0.00	0.10
E-1039	विकास निधीतून होणारा खर्च	0.00	3.00
E-1072	कुपवाड येथील हिंदू स्मशानभूमी विकसीत करणे	0.00	0.10
E-1131	थकीत देयके आदा तरतूद	15.00	0.00
E-1148	1 ते 20 वार्डामधील विकास कामांसाठी 78 सन्मा. सदस्य प्रत्येकी रु.15 लाख प्रमाणे निधी (प्रभाग समिती कडून करावयाची कामे)	7.80	0.00
E-1169	मा.स्थायी समिती सदस्य प्रत्येकी 25 लाख प्रमाणे	4.00	0.00
E-1095	जुने अतिथीगृह पाडून नवीन कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधणे,सांगली	0.00	2.00
E-1213	वृक्ष लागवड करणे -14 वा वित्त आयोग	0.00	5.00
	एकुण	**36.25**	**36.20**

वरील प्रमाणे सन २०१९-२०२० चे सुधारीत अंदाजपत्रकासह सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रकातील बदल सुचवून महासभेचा अंदाज खालील प्रमाणे

मा.महासभा मजूर अदाज

तपशील	सन 2019-2020 चे सुधारीत अंदाजपत्रक		सन 2020-2021 चे मुळ अंदाजपत्रक	
आरंभीची शिल्लक		457094369		1788485085
जमा बाजू				
महसुली जमा	2470006547			2843556900
डेडहेडस जमा	594596189			671244800
शासन सु.शिल्लक ब	0	2338095969		0
भांडवली जमा -ब	1957200000			1845700000
एकूण जमा	5021802736		5360501700	
जनरल / शासन फंड शिल्लकेसह जमा		7816993074		7148986785
महसुली खर्च	2230724800			2878120106
भांडवली खर्च-अ	692637000			1283551000
डेडहेडस खर्च	594596189			671244800
भांडवली खर्च-ब	2510550000			2307750000
एकूण खर्च	6028507989		7140665906	
जनरल फंड/ शासन संभाव्य शिल्लक		1788485085		8320879

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९६ मधील तरतूदीनुसार स्थायी समितीने सादर केलेले सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे सन २०२०-२०२१ या वर्षाच्या अर्थसंकल्पास वरील प्रमाणे महासभेने निश्चित केलेल्या दुरुस्तीसह उक्त अधिनियमाच्या कलम १०० अन्वये ही सभा अंतिम स्विकृती देत आहे.

सूचक :- मा. गजानन शामू मगदूम. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. संदिप सुरेश आवटी.

(सौ.गिता सुयोग सुतार)
महापौर,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मुख्य लेखाधिकारी
महानगरपालिका सांगली
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १६/०७/२०२०

ठराव क्रमांक :- २३

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे शहर अभियंता (बांधकाम विभाग) यांचे दि.०५/०५/२०२० चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामांच्या अनुषंगाने मा.अवर सचिव,नगर विकास विभाग,महाराष्ट्र शासन मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.-रस्ताअ-२०१९/प्र.क्र.१००/नवि-१६ दि.२०/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०१९-२० साठी विशेष रस्ते अनुदान अंतर्गत शासनाकडून र.रु.७५.०० लक्ष निधी मंजूर झाला असून, सदर मंजूर निधी साठी १००% शासन अनुदान असून, ते महानगरपालिकेस दि.०६/०३/२०२० रोजी प्राप्त झाले आहे.

त्यानुसार मंजूर/ प्राप्त अनुदान र.रु.७५.०० लक्ष अनुदानासाठी कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे मान्यतेस्तव सादर करणेस प्रशासनाने मा.महापौरसो व मा.सभापती,स्थायी समिती यांचे मागणीनुसार खालील कामांचे प्रस्ताव सादर केले असून, त्याचा तपशिल खालील प्रमाणे....

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय र.रु.
१.	सांगली वॉर्ड क्र.१७ मधील समर्थ मारुती मंदिर चौक ते तपकिरे बंगल्यापर्यंत रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे	४७,७०,०००/-
२.	मिरज मधील (१) महाराणा प्रताप चौक ते बॉम्बे बेकरी (२) बॉम्बे बेकरी ते शिवाजी चौक (३) शिवाजी चौक ते गांधी चौक पर्यतच्या रस्ता हॉटमिक्स डांबरी करणे	७९,३१,३००/-
	एकूण र.रु.	**१,२७,०१,३००/-**

उपरोक्त मागणीनुसार सादर करणेत आलेल्या प्रस्तावांच्या दोन कामांचे एकूण अंदाजपत्रक र.रु.१,२७,०१,३००/- होत असून, सन २०१९-२० साठी विशेष रस्ता अनुदान अंतर्गत शासनाकडून र.रु.७५.०० लक्ष निधी मंजुर झाला असलेने, उपरोक्त दोन कामांमधील अं.क्र.२ मधील नमुद कामगिरी रद्द करुन, खालील प्रमाणे एकूण तीन कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,सांगली यांचेकडे मान्यतेस्तव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय र.रु.
१.	सांगली वॉर्ड क्र.१७ विकास चौक मधील समर्थ मारुती मंदिर चौक ते तपकिरे बंगल्यापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे	४७,७०,०००/-
२.	सांगली वॉर्ड क्र.१७ मधील जवाहर चौक येथील गणेश मंदिर परिसरातील रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे.	१७,००,०००/-
३.	सांगली वॉर्ड क्र.१७ मधील भूविकास बँक ते समाधान बंगला द.+उ.रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे.	९,९७,१००/-
	एकूण र.रु.	**७४,६७,१००/-**

शहर अभियंता

सूचक :- कु. सोनाली विलास सागरे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- नसीमा गैबीसो नाईक

महापौर,